# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,जिल्हाधिकारी कार्यालय,नागपूर

**विषय :- भुसंपादन प्रकरण क्रमांक ३/अ-६५/२०११-१२ मौजा – रायवाडी (जुनी) (गावठाण) ता. सावनेर जि. नागपुर मध्ये प्रारूप निवाडयास मुदतवाढ**

भुसंपादन अधिनियम – २०१३ अन्वये कलम १९(१) ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक ०९ आक्टोंबर, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असल्याने दिनांक ०८ आक्टोंबर, २०२० पावेतो अंतिम निवाडा करणे आवश्यक होता, परंतु कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प विभाग,नागपूर यांचेकडुन संपादीत मालमत्तेचे (बांधकामाचे) मुल्याकंन अहवाल (इस्टीमेट प्रती) साक्षांकित करून सादर न केल्यामुळे व अंदाजित निवाडा निधी वेळेच्या आत प्राप्त न झाल्यामुळे कलम १९(१) ची अधिसुचना संपुष्ठात आलेली होती.

त्या अनुषंगाने संबंधीत संपादन संस्था यांचे विनंतीवरून उक्त प्रकरणामध्ये मा. जिल्हाधिकारी, नागपूर (समुचित शासन) यांनी दिनांक २५-११-२०२० रोजीचे मुदतवाढ टिपणीनुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक ३/अ-६५/२०११-१२ मौजा–रायवाडी (जुनी) (गावठाण) ता. सावनेर जि. नागपुर मध्ये प्रारूप निवाडयाकरीता दिनांक ०८ आक्टोंबर, २०२० च्या पुढे बारा महिण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे.

(डॉ.शिवनंदा लंगडापुरे)
**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.१)**
**वि.पा.वि.म., नागपूर**